# पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६
## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे- रोहिंजण, ता. पनवेल येथील पश्चिमेस राष्ट्रीय महामार्गाजवळील सर्व्हे नं. ४२/५ पासुन ते मौजे- धरणाकॅम्प येथील सर्व्हे नं. १४ पर्यंतच्या २४.०० मी. रूंदीच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. सदर २४.०० मी. रूंद रस्त्याच्या रेखांकनाने मौजे- धरणाकॅम्प, ता. पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं- ९/१ बाधित होत आहे. तसेच तद्नंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८(४) अन्वये दि. २५/०६/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजनानुसार सदर रस्त्याच्या रेखांकनामध्ये फेरबदल क्र. M५.२ नुसार फेरबदल करण्यात आला आहे. त्यानुसार मौजे- रोहिंजण, ता. पनवेल येथील पश्चिमेस राष्ट्रीय महामार्गाजवळील सर्व्हे नं. ४२/३ पासुन ते मौजे- धरणाकॅम्प येथील सर्व्हे नं. १४ पर्यंतच्या २४.०० मी. रूंदीच्या नियोजित रस्त्यामधील मौजे- धरणाकॅम्प येथील सर्व्हे नं. ९/१ मधून प्रस्तावित २४.०० मी. रस्त्याखालील बाधित क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णन :- मौजे- धरणाकॅम्प, ता. पनवेल येथील मे. ॲम्बिशिअस रिअल्टर्स यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील आरक्षणाने बाधित व रस्त्याने बाधित क्षेत्र पुढीलप्रमाणे :-
१) मौजे- धरणाकॅम्प, सर्व्हे नं. ९/१ रस्त्याने बाधित क्षेत्र – ३७९६.६०१ चौ. मी.

त्यास नकाशानुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस : ला.ग.नं. ८/०
पश्चिमेस : लागून मौजे- धानसर शीव
दक्षिणेस : लागून मौजे- धानसर शीव
उत्तरेस : ला.ग.नं. ९ (पै) उर्वरित क्षेत्र

टिप :- उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.

सहाय्यक संचालक नगररचना
पनवेल महानगरपालिका,

जा क्र. - पमपा/नरवि/टिडीआर/२६-२६/५४६ /२०२६ दिनांक : १०/०८/२०२६

टिप - सदरची जाहीर नोटीस पनवल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

PANVEL MUNICIPAL CORPORATION पनवेल महानगरपालिका पनवेल-रायगड PANVEL-RAIGAD